# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०—२५६०१३५३,
२५६०१२६३
ई—मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

संदर्भ क्र.:आयक्यूएसी/ ९२० दिनांक: २७.१२.२०१९

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय :—'आविष्कार'संशोधन संकल्पनांचे पोस्टर सादरीकरणाबाबत.

महोदय / महोदया,

'आविष्कार' या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'आविष्कार' पोर्टल विकसित करण्यात आलेले असून या पोर्टलवर स्टेज—१ अंतर्गत विद्यार्थ्यांकडून संशोधन विषयक संकल्पना ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या होत्या.

विषय तज्ज्ञांकडून सदर संशोधन विषयक संकल्पनांचे मूल्यमापन करण्यात आलेले असून पात्र संशोधन विषयक संकल्पनांचा समावेश स्टेज—२ मध्ये करण्यात आलेला आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या संशोधन संकल्पना स्टेज—२ साठी पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांना 'आविष्कार पोर्टल' वर स्टेज—१ चा निकाल व विषयतज्ज्ञांकडून नमूद करण्यात आलेले शेरे (Remarks) त्यांच्या लॉग—ईन मध्ये पाहण्यास उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

तसेच संबंधित महाविद्यालयांनाही त्यांच्या महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांचे निकाल खालील लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

avishkar.unipune.ac.in/ARC/Login.aspx

वरील लिंकवर गेल्यानंतर महाविद्यालयांनी त्यांचा PUN Code/BCUD Code व पासवर्ड वापरुन login करावे.

स्टेज—२ साठी पात्र ठरविण्यात आलेल्या संशोधन संकल्पनांबाबत विषयतज्ज्ञ प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. 'आविष्कार' संशोधन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन संकल्पनांचे पोस्टर तयार करणे व त्याव्दारे सादरीकरण (Presentation) करणे आवश्यक असते. या पोस्टरमध्ये संशोधन संकल्पनेची मांडणी व त्या संबधीचा मजकूर यास अत्यंत महत्व असते. ही बाब लक्षात घेता, विद्यार्थ्यांनी त्यांच्या संशोधन संकल्पनेबाबतचे पोस्टर तयार करणे आवश्यक आहे. यासाठी ज्या विद्यार्थ्यांच्या संशोधन संकल्पना स्टेज—१ मध्ये पात्र झाल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांनी विषयतज्ज्ञांनी नमूद केलेले शेरे विचारात घेऊन ए—३ साईज पेपरवर पोस्टरचा मसुदा तयार करून सोबत घेऊन यावयाचा आहे.

मा.प्राचार्य/संचालक/शैक्षणिक संशोधन समन्वयक यांना कळविण्यात येते की, आविष्कार स्पर्धेची स्टेज — २ (विभागीय स्पर्धा व तज्ज्ञांचे मार्गदर्शन) माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या/दुसऱ्या आठवडयात आयोजित करण्यात येणार आहे. आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील स्टेज—२ साठी पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या संशोधन संकल्पनांचे पोस्टर तयार करून सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे संबधित विद्यार्थ्यांना संबंधित ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे ही विनंती.

कळावे,

आपला,

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)

सोबत— जिल्हानिहाय'आविष्कार' संशोधन संकल्पनांचे पोस्टर सादरीकरणाबाबत वेळापत्रक.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६०१३५३,
२५६०१२६३
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

**जिल्हानिहाय 'आविष्कार' संशोधन संकल्पनांचे पोस्टर सादरीकरण व मार्गदर्शनाबाबतचे वेळापत्रक**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | जिल्हा | दिनांक | विद्याशाखा |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आभियांत्रिकी महाविद्यालय, विळद घाट, अहमदनगर | अहमदनगर | ०३/०१/२०२० | सर्व विद्याशाखा |
| २ | एच.पी.टी. कला आणि आर. वाय.के. विज्ञान महाविद्यालय, नाशिक | नाशिक | ०४/०१/२०२० | आभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर सर्व विद्याशाखा |
| ३ | लोकनेते गोपीनाथजी मुंडे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग एज्यूकेशन अॅन्ड रिसर्च, कॅनडा कॉर्नर, नाशिक | नाशिक | ०४/०१/२०२० | आभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| ४ | ए.आय.एस.एस.एम.एस. अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे | पुणे ग्रामीण | ११/०१/२०२० | आभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| ५ | डॉ.डी.वाय.पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे | पुणे शहर व पुणे ग्रामीण | १२/०१/२०२० | आभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्या शाखेव्यतिरिक्त इतर सर्व विद्याशाखा |
| ६ | पिंपरी–चिंचवड आभियांत्रिकी महाविद्यालय, रावेत | पुणेशहर | १२/०१/२०२० | आभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा |

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)